(बोधचिन्ह)                पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८

## महिला बालकल्याण, मागासवर्गीय कल्याणकारी योजना

## जाहीर प्रकटन

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या, नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत महिला व बालकल्याण योजना, मागासवर्गीय कल्याणकारी योजना इत्यादी कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. त्यानुसार २०१०-११ या आर्थिक वर्षाकरिता खालीलप्रमाणे नमुद केलेल्या घटक योजनाचा लाभ घेणेकामी पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरातील संबंधीत घटकातील अर्जदाराकडुन दिनांक :- २५/०६/२०१० ते दिनांक :- २४/०७/२०१० याकालवधीत विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

## महिला व बाल कल्याण योजना

| अ.क्र. | योजना | पात्रता अटी | इतर महत्वाचे अटी |
|---|---|---|---|
| १ | इयत्ता ८ वी १२ वी मध्ये शिकत असलेल्या मुलींना मोफत सायकल वाटप | i) मागील वर्षांच्या वार्षिक परिक्षेत किमान ५०% गुण आवश्यक | i)लाभार्थींचे वास्तव्य पिंपरी चिंचवड मनपा हद्दीत असलेबाबत रेशनिंग कार्ड, घरपट्टी पावती व पालकाचे ओळखपत्र ,लाईट बिल व इतर तत्सम पुरावा .<br>ii)कुंटुंबाचे मागील वर्षाचे वार्षिक उत्पन्न र.रु. १,००,०००/- पेक्षा कमी असलेबाबत मा. तहसिहलदार यांचा दाखला किंवा रेशनिंग कार्डवरील उत्पन्न |
| २ | महिलांना स्वयंरोजगारासाठी मोफत शिवणयंत्र वाटप | i)शिवणकामातील शासन मान्य संस्थेचा किमान ३ महिन्यांचा शिवणक्लास पूर्ण केलेला असावा त्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक | वरीलप्रमाणे |
| ३ | मुलांना तांत्रिक प्रशिक्षणासाठी अर्थसहाय्य | i)एस.एस.सी. नंतरचे शासकीय / शासनमान्य संस्थेचे (आ.टी.आय.) प्रवेश दाखला फक्त<br>ii)प्रशिक्षण कालावधी कमीत कमी १ वर्षांपर्यंत असावा | वरीलप्रमाणे |
| ४ | गुणवत्ता वाढीसाठी खाजगी क्लासची देणेकामी अर्थसहाय्य | i)इयत्ता १० मध्ये शिकत प्रवेश घेतला असणे आवश्यक<br>ii)इयत्ता ९ वीच्या वार्षिक परीक्षेत किमान ६० % गुण आवश्यक<br>iii)क्लासमध्ये प्रवेश घेल्याबाबतची | वरीलप्रमाणे |

| | | | |
|---|---|---|---|
| | | पावती सोबत जोडावी. | |
| ६ | परदेशातील उच्च शिक्षण / प्रशिक्षण अभ्याक्रमासाठी निवड झालेल्या युवतीस अर्थसहाय्य | i)परदेशातील उच्च शिक्षण / प्रशिक्षण अभ्याक्रमासाठी निवड झाल्याबाबतची कागदपत्रे सादर करावी लागतील. | |
| ७ | इयत्ता १२ वी नंतरचे वैद्यकीय (M.B.B.S. अभियांत्रिकी संगणक प्रथमवर्ष पदवी परीक्षा ) यासारखे उच्च शिक्षण घेणा-या युवतींना अर्थसहाय्य | i)अर्जदारास अभ्यासक्रम गुणवत्तेनुसार (फ्री सीट) प्रवेश मिळालेला आवश्यक शैक्षणिक अर्हता व प्रवेशा संबधित कागद पत्रे सादर करणे आवश्यक | वरीलप्रमाणे |
| ८ | युवतींना व्यवसायासाठी हत्यारांचे किट्स घेणेकामी अर्थसहाय्य | i)अर्जदार युवतींचे वय १६ अथवा त्या पुढील वयोगटातील असावे.<br>ii)यशस्वापणे प्रशिक्षण पुर्णकेलेल्या युवतींस स्वत : चा रोजगार सुरु करण्यासाठी किट्स खरेदीसाठी अर्थसहाय्य दिले जाईल.<br>iii)किट्स खरेदी करणेकामी विक्री कर असलेले कोटेशन आवश्यक<br>iv)शासकीय/ शासन मान्य संस्थेत किंवा किमान ३ महिने कालावधीचा व्यवसाय प्रशिक्षण पूर्ण केलेबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक | वरीलप्रमाणे |
| ९ | विधवा घटस्फोटित महिलांना अर्थसहाय्य | i) महापालिका क्षेत्रात वास्तव्य असलेल्या विधवा महिलेने पतीच्या मृत्यू दाखल्याची प्रत सादर करणे आवश्यक आणि<br>ii) घटस्फोटित महिलेने न्यायालयाकडील आदेशाची प्रत सादर करणे आवश्यक. | वरीलप्रमाणे |
| १० | एक वर्ष पुर्ण झालेल्या गटास अर्थसहाय्य देणे | i)१० ते २० महिला सभासद असलेल्या बचत गटास किमान ३ वर्ष पुर्ण झालेले असणे आवश्यक<br>ii)सध्या बचतगट कार्यरत असणे आवश्यक<br>iii)बचतगटाची म.न.पा. कडील नोंदणी आवश्यक | वरीलप्रमाणे |
| ११ | नोंदणीकृत महिला संस्थेला/बचतगटाला/बचतगट महासंघाला व्यवसाय करण्यासाठी कर्जाच्या रक्कमेनुसार अर्थसहाय्य देणे. | i)बचतगटाला १ वर्ष पुर्ण झाले असावे<br>ii) व्यवसाय करण्यासाठी व्यवसायाची निवड, भांडवल, जागा, मशनरी, (विद्युत पाणी खर्च) बाजारपेठ इ. विचार करुन प्रकल्प अहवाल जिल्हा उद्योग | वरीलप्रमाणे |

| | | | |
|---|---|---|---|
| | | केंद्रामार्फत तपासुन घेवुन व शिफारशीसह सादर करणे.<br>**iii)** मनपाच्या परवाना विभागाची शॉप ॲण्ड एस्टॅब्लिशमेंट विभाग व विद्युत मंडळाची परवानगी घेणे बंधनकारक राहील.<br>**iv)** बचतगट महासंघ असेल तर धर्मदाय आयुक्त यांची नोंदणी चा दाखला<br>**v)** बँकेकडील कर्ज मंजुरीचे पत्र | |
| १२ | अस्तित्व पुनर्वसन योजना | **i)** अर्जदार महिलेचे वय २१ वर्षापेक्षा कमी असणे.<br>**ii)** महिला अत्याचारीत, पिडीत असणेबाबत पोलिस निरिक्षक यांचा अहवाल, एफ.आ. आर. ची प्रत सादर करणे आवश्यक राहील. | |
| १३ | सावित्रीबाई फुले पुरस्कार (वैयक्तिक) | **i)**महिला व बाल कल्याण क्षेत्रात कामगिरी बजावणा-या नामवंत समाजसेविका पिं.चिं. मनपा हद्दीतील असाव्यात<br>**ii)** समाजसेविकेने कमीत कमी ३ वर्ष कार्य केलेले असावेत | |
| १४ | सावित्रीबाई फुले पुरस्कार (सामाजिक संस्था) | **i)**महिला व बाल कल्याण क्षेत्रात महिलांच्या आर्थिक व सामाजिक उन्नतीसाठी, शिक्षण, पुर्नवसन, आरोग्य, अन्याय निर्मुलन, अंधश्रध्दा रुढी जनजागरण इ. क्षेत्रात कार्य करणा-या महापालिका हद्दीतील संस्थांना हा पुरस्कार दिला जाईल.<br>**ii)**स्वयंसेवी संस्था ही द सोसायटी रजिस्टेशन ॲक्ट नुसार (सहकारी तत्वावर ) पंचीबध्द असावी<br>संस्थेची नोंदणी किमान ५ वर्षापुर्वी झालेली असावी<br>**iii)**संस्था व तिचे कार्य हे कोणत्याही पक्ष व राजकारणापासुन अलिप्त असावी | |
| १५ | नोंदणीकृत महिला संस्थांना पाळणघर सुरु करण्याकरिता अर्थसहाय्य | **i)**महिला संस्था / मनपाकडील नोंदणीकृत अनुदान प्राप्त महिला बचतगटांना किमान १ वर्ष संस्था कार्यरत असणे आवश्यक व बचतगट | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | असेल तर तो मनपाकडील नोंदणीकृत असणे आवश्यक<br>**ii)**५ वर्ष वयाच्या आतील किमान १५ बालकांना प्रवेश दिलेला असावा. | |

## मागासवर्गीय कल्याणारी योजना

| अ.क्र. | योजना | पात्रता अटी | इतर महत्वाचे अटी |
|---|---|---|---|
| १ | इयत्ता ५ वी ते १० वी मधील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटप | **i)**खाजगी व शासकीय व खाजगी शाळेतील इयत्ता ५ ते १० मधील ४५% किंवा त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त करणे आवश्यक, त्याबाबतची मार्कशीट सादर करणे आवश्यक. | **i)**अर्जदार विद्यार्थ्यांने मा. उपजिल्हाधिकारी यांचेकडील (अनु जाती अनु जमाती, विमुक्त जाती व भटकी जमात) या जातींचा दाखला सादर करणे आवश्यक<br>**ii)**लाभार्थींचे वास्तव्य पिंपरी चिंचवड मनपा हद्दीत असलेबाबत रेशनिंग कार्ड, घरपट्टी पावती व पालकाचे ओळखपत्र ,लाईट बिल व इतर तत्सम पुरावा |
| २ | इयत्ता ८ वी १२ वी मध्ये शिकत असलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना (मुली / मुले ) मोफत सायकल वाटप | **i)**मागील वर्षांच्या वार्षिक परीक्षेमध्ये किमान ५०% किंवा त्यापेक्षा जास्त गुण आवश्यक | वरीलप्रमाणे |
| ३ | इयत्ता १२ वी नंतरचे वैद्यकीय (M.B.B.S. अभियांत्रिकी संगणक प्रथमवर्ष पदवी परीक्षा ) यासारखे उच्च शिक्षण घेणा-या विद्यार्थी / विद्यार्थीनीना अर्थसहाय्य | **i)**अर्जदारास सदर अभ्यासक्रमाकरिता गुणवत्तेनुसार (फ्री सीट) प्रवेश मिळालेला आवश्यक<br>**ii)**शैक्षणिक अर्हता व प्रवेशा संबधित कागद पत्रे सादर करणे आवश्यक | वरीलप्रमाणे |
| ४ | मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्थाना घरबांधणीसाठी अर्थसहाय्य | **i)**संस्था नोंदणी अधिनियमान्वये सदर सहकारी संस्था नोंदणीकृत असावी.<br>**ii)**संस्थेतील सभासदांचे पिं. चिं. मनपा क्षेत्रात किमान ३ वर्ष वास्तव्य आवश्यक प्रत्येक सभासदांचा जातीचा दाखला आवश्यक<br>**iii)**सभासद संस्थेच्या जास्तीत जास्त | वरीलप्रमाणे |

| | | | |
|---|---|---|---|
| | | १०% सभासद बिगर मागासवर्गीया मधील आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांतील राहतील.<br>**iv)**आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांतील सभासदांस र.रु. १५,०००/- पर्यत आणि मागासवर्गीय गटातील सदस्यांच्या कुंटुबांची र. रु. ५०,०००/- पर्यंत दरवर्षाची उतपन्न मर्यादा रहील. | |
| ५ | मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्थाना घरदुरुस्तीसाठी अर्थसहाय्य | **i)**प्रत्येक सभासदांचा जातीचा दाखला आवश्यक<br>**ii)**संस्था नोंदणी अधिनियमातंर्गत नोंदणीकृत असावी.<br>**iii)**मनपा कर पुर्ण भरलेला असणे आवश्यक<br>**iv)**संस्थेचे हमी पत्र आवश्यक | वरीलप्रमाणे |

वरील सर्व घटक योजनांचे विहित नमुन्यातील अर्ज व योजने बाबतचा इतर सर्व तपशील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या चारही प्रभाग कार्यालयातील “नागरी सुविधा केंद्रामध्ये” (आधारकेंद्रामध्ये) कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दिलेल्या मुदतीस सकाळी ११ ते दु. ४ या वेळेत उपलब्ध होतील. अर्जात नमुद केलेल्या अटी व शर्ती नुसार आवश्यक प्रमाणित कागदपत्रे जोडल्याशिवाय तसेच अपुर्ण भरलेले / अपात्र तसेच मुदतीनंतरचे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. अर्ज सादर करताना अर्जदाराने मुळ कागदपत्रे तपासणी कामी आणणे आवश्यक आहे.

१) अर्ज वाटप दिनांक :- १८/०६/२०१० ते दिनांक :- १७/०७/२०१० अखेर
२) अर्ज स्विकृती दिनांक :- २५/०६ /२०१० ते दिनांक :- २४/०७/२०१० अखेर

सही/-
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

जाहिरात क्रमांक :- ७०
नागरवस्ती विकास योजना विभाग
क्रमांक :- नावियो / ९ /कावि/ २४५ /१०
दिनांक :- १७/०६/२०१०.